ePaper

## चालकाला झोप आली तर अलार्म वाजणार, एसटीत आता स्मार्ट ई-बसेस

वर्ष - 8 । अंक - 304 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- स्मिथने मोडला ९९ वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड
- रोहित वनडे क्रिकेटलाही रामराम
- डोनाल्ड ट्रम्प यांचा चीनशी करार!
- कुशवाहांकडूनही दबावाचे राजकारण


www.mahaenews.com । गुरुवार, दि. 12 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## चीनला पाकड्यांचा पुळका, ब्रह्मपुत्रा नदीवर बांधणार जगातील सर्वात मोठे धरण, भारताचे पाणी अडवणार...


# चीनचा भारतावर 'वॉटर बॉम्ब'!

## भारताच्या ईशान्येकडील राज्ये म्हणे, दुष्काळाने तडफडायला लावणार !

। बीजिंग / नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज



**भारत आणि पाकिस्तानच्या संघर्षाचे परिणाम म्हणून भारताने सिंधू नदीचे पाणी अडवण्याचा निर्णय घेतला. पण, पाकिस्तानचा पुळका असणाऱ्या चीनने मात्र याचा निषेध केला असून भारताच्या ईशान्य भागात वाहणाऱ्या ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वात मोठे धरण बांधून या राज्यांमधील नागरिक दुष्काळाने कसे तडफडतील, हे पाहणे चीनच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. भारताचे नाक दाबले की तोंड उघडेल, अशी वक्तव्ये चीनच्या प्रमुख नेत्यांनी केली आहेत.**



### काय आहे चीनचा प्लॅन ?

भारतातून पाकिस्तानात वाहणाऱ्या सहा नद्या आहेत, त्यातील सिंधू नदीचे पाणी अडवून पाकिस्तानला धडा शिकवण्याचा निर्णय भारताने घेतला. त्याचप्रमाणे, भारताच्या ईशान्येकडे वाहणारी ब्रह्मपुत्रा ही मुख्य नदी चीन मधून भारतात येते आणि आपल्या ईशान्येतील काही राज्यांमधून तिचा प्रवास होतो. ब्रह्मपुत्रेवर जगातील सर्वात मोठे धरण बांधून तिचे पाणी अडवले तर भारताच्या ईशान्येकडील राज्यांमध्ये दुष्काळ पडेल, असे स्वप्न चीन पाहत आहे. चीनला पाकड्यांचा पुळका असल्यामुळे भारताचा बदला ते अशा प्रकारे घेणार आहेत.

### यामुळे नेमके काय होईल?

चीनने हे पाऊल उचलले, तर त्यामुळे नेमके काय होईल याची तपासणी करण्यासाठी आणि वस्तुस्थिती पाहण्यासाठी भारताचे उच्चस्तरीय अधिकारी बैठकांमागून बैठका घेत आहेत. या धरणामुळे पूर्ण ब्रह्मपुत्रा नदीच्या पात्रावर चीनचा ताबा राहू शकतो आणि भारतासाठी हा 'वॉटर बॉम्ब' आहे असे चीनला वाटते. ज्याप्रमाणे, पाणी अडवून भारताच्या काही राज्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती आणण्याचा चीनचा डाव आहे, त्याचप्रमाणे, अचानक पाणी सोडून या राज्यांमध्ये पूरजन्य परिस्थितीही ते आणू शकतात, हे देखील त्यांचे कारस्थान असावे.

### वीजनिर्मितीवर परिणाम..

असे झाले तर, ईशान्येकडील राज्यांमध्ये जी वीजनिर्मिती होते, त्यावर देखील मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊ शकतो, शिवाय जलसिंचन, पाटबंधारे यांनाही फटका बसू शकतो.

### भारताचे पाऊल महत्त्वाचे..

चीनच्या या भारतविरोधी हालचाली नंतर भारताच्या अधिकाऱ्यांनी तातडीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. मुख्य म्हणजे, चीनला अशा पद्धतीने नदी अडवण्याचा अधिकार नाही, असे त्यांना ठणकावून सांगण्यात आले आहे.

### चीनचा वाटा किती ?

ब्रह्मपुत्रा नदीच्या एकूण पाण्याच्या विसर्गात चीनचा वाटा फक्त २२ ते ३० टक्के आहे, हे भारताच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत सिद्ध झाले आहेत. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी चीनवर तीव्र टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, ही नदी भारतातही वाहते, मध्ये थांबत नाही. चीनने मनात आणले तरी ते असे करू शकत नाहीत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### पाकची आडमुठी भूमिका

दरम्यान, पाकचे पंतप्रधान शहाबाज शरीफ यांचे वरिष्ठ सहायक राणा इहसान अफझल यांनी पाकबरोबरचा सिंधू जल करार रद्द करण्यात आल्यानंतर चीन ब्रह्मपुत्रेच्या पाण्याचा भारतात जाणारा प्रवाह रोखू शकतो, असे वादग्रस्त विधान केले होते. जर भारताने असे काही केले आणि पाकला जाणारा प्रवाह थांबवला, तर चीनही तसेच करू शकतो. पण जर अशा गोष्टी घडल्या, तर संपूर्ण जगावर युद्धाचे संकट ओढवेल, असे अफझल यांनी म्हटले आहे.

### भारताने चिंता करण्यासारखे कारण नाही..!

चीनने ब्रह्मपुत्रेवर जगातील सर्वांत मोठ्या जलविद्युत धरणाच्या बांधकामाला मान्यता दिली आहे. या नदीच्या प्रवाहाचा काही भाग बोगद्यांमधून वळवून जलविद्युत निर्मिती करणे, या प्रकल्पात समाविष्ट आहे. चीनने पाण्याचा प्रवाह बदलणे भारतासाठी चिंतेची बाब असली, तरी ही चिंता हंगामी आहे. म्हणजेच पाऊस नसलेल्या महिन्यांत याचा विपरीत परिणाम जाणवू शकतो. मुख्य म्हणजे हा प्रकल्प चीनसाठीदेखील आव्हाने निर्माण करणारा आहे, असे जागतिक तज्ज्ञांना वाटते. तिबेट पठार भूकंपाच्या दृष्टीने सक्रिय आहे. मोठे धरण प्रकल्प धोकादायक ठरू शकतात आणि त्यामुळे मोठे भूकंप होण्याची शक्यता आणखी वाढते. कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे विनाशकारी पूर येऊ शकतो, जो चीनसाठी देखील हानिकारक असेल, असे जागतिक तज्ज्ञांना वाटते.

### चीनला शक्य आहे का ?

तांत्रिक, भौगोलिक व भू-राजकीय घटकांचा विचार केल्यास चीन ब्रह्मपुत्रेचा प्रवाह काही प्रमाणात बदलू शकतो. मात्र, पूर्णपणे थांबवू शकत नाही.

# पुण्यात 42 प्रभाग, रचनेत बदलाची शक्यता!

## सभासद 166 वरुन कमी होऊन 165 होण्याची शक्यता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महापालिकेच्या निवडणुकांसाठी राज्य सरकारने जाहीर केलेल्या प्रभाग रचनेनुसार पुणे महापालिकेची निवडणूक ही चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार आहे. २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे आगामी महापालिका निवडणूक होणार असून, २०११ ची लोकसंख्या गृहीत धरली जाणार आहे. त्यामुळे पुण्यात ४२ प्रभाग होणार आहेत.**




महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आलेली उरुळी आणि फुरसुंगी ही दोन गावे राज्य सरकारने वगळल्यामुळे प्रभाग रचनेत बदल करावा लागणार आहे. त्यामुळे नगरसेवकांची संख्या १६६ ऐवजी एक कमी होऊन १६५ होण्याची शक्यता महापालिका प्रशासनाने वर्तविली आहे.महापालिकेत ३० लाख लोकसंख्येला १६१ नगरसेवक आणि त्या पुढील प्रत्येक एक लाख लोकसंख्येला एका नगरसेवकाची संख्या वाढवली जाते. २०११ मध्ये पुणे शहराची लोकसंख्या ३१ लाख २४ हजार होती. नवीन ११ गावांची लोकसंख्या सुमारे दीड लाख आणि त्यानंतर नव्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांची लोकसंख्या अडीच लाखांच्या आसपास होती. ही एकत्रित लोकसंख्या सुमारे ३५ लाख ५० हजारांच्या जवळपास जाते. त्यामुळे ३० लाखानंतर प्रत्येक एक लाख लोकसंख्येसाठी एक नगरसेवक असणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे महापालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपरिषद केली. २०२१ मध्ये महापालिकेच्या हद्दीत २३ गावे समाविष्ट झाल्याने २०१७ च्या निवडणुकीची प्रभाग रचना बदलावी लागणार आहे. दोन गावे वगळल्याने या गावांतील लोकसंख्या कमी होणार आहे. त्यामुळे महापालिकेतील सभासद संख्या १६६ वरून एकने कमी होऊन १६५ होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.पुणे शहर तसेच महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांची २०११ ची लोकसंख्या लक्षात घेता आगामी महापालिका निवडणुकीत ४२ प्रभाग असणार आहेत. यामध्ये ४० किंवा ४१ प्रभाग चार सदस्यांचे असण्याची शक्यता आहे. दोन प्रभाग तीन सदस्यांचे किंवा एक प्रभाग दोन सदस्यांचा असू शकतो, असे महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. पुणे महानगरपालिकेची आगामी निवडणूक चार सदस्य प्रभाग पद्धतीने होणार असल्याचे आदेश राज्य सरकारकडून आले आहेत. याचा अभ्यास करून महापालिका पुढील नियोजन करण्यासाठी सज्ज आहे.महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आलेली उरुळी आणि फुरसुंगी ही दोन गावे राज्य सरकारने वगळल्यामुळे प्रभाग रचनेत बदल करावा लागणार आहे. १६६ ऐवजी एक कमी होऊन १६५ होण्याची शक्यता महापालिका प्रशासनाने वर्तविली आहे.

### प्रभाग रचना बदलावी लागणार

२०११ मध्ये पुणे शहराची लोकसंख्या ३१ लाख २४ हजार होती. नवीन ११ गावांची लोकसंख्या सुमारे दीड लाख आणि त्यानंतर नव्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांची लोकसंख्या अडीच लाखांच्या आसपास होती. ही एकत्रित लोकसंख्या सुमारे ३५ लाख ५० हजारांच्या जवळपास जाते. त्यामुळे ३० लाखानंतर प्रत्येक एक लाख लोकसंख्येसाठी एक नगरसेवक असणार आहे.विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे महापालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपरिषद केली. २०२१ मध्ये महापालिकेच्या हद्दीत २३ गावे समाविष्ट झाल्याने २०१७ च्या निवडणुकीची प्रभाग रचना बदलावी लागणार आहे.

# कट्टर धर्मवाद मान्य नाही : अजित पवार

## राष्ट्रवादी काँग्रेस समाजासाठी काम करणारा पक्ष

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) पाठिंबा दिला असला, तरी कट्टर धर्मवाद राष्ट्रवादी काँग्रेसला मान्य नाही. हा शोषित, वंचित, मागासवर्गीय, तसेच अल्पसंख्याक समाजासाठी काम करणारा पक्ष आहे. जातीय द्वेष, धार्मिक द्वेष तसेच कोणत्याही हिंसेला पक्षात स्थान नाही,' असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापनदिनानिमित्त भाषण करताना, अजित पवार यांनी सत्तेत सहभागी होण्याबाबतची कारणमीमांसा करतानाच, 'विचारांशी तडजोड केली जाणार नाही,' असे स्पष्ट करून, कार्यकर्त्यांनाही तसे आवाहन केले.**



आपण लोककल्याणाचा ध्यास स्वीकारला आहे. सत्ता येईल, सत्ता जाईल. परंतु, राज्यातील प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी विचार जिवंत राहिला पाहिजे. सत्तेवर असलो, तरी सरकारमधून आणि सत्तेत नसलो, तर रस्त्यांवर संघर्ष करून ही जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. विचारांशी कधीही तडजोड केली जाणार नाही,' असे पवार यांनी सांगितले.'केंद्रात सत्ताधारी म्हणून काम करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक निर्णय रोखठोक घेतले,' असा उल्लेख करून ते म्हणाले, 'केंद्रात काँग्रेस आघाडीची सत्ता असताना जातीय जनगणनेची केवळ चर्चा होत होती. मात्र, त्यावर काही निर्णय झाला नाही. मात्र, मोदी सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. यामुळे जातींची लोकसंख्या निश्चित होणार आहे,' असे त्यांनी सांगितले. राष्ट्रवादी सत्तेत असल्यामुळे आपल्या सर्वांचाच फायदा होत असल्याचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी नमूद केले. ते म्हणाले, 'भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) बरोबर जाण्याचा प्रयत्न २०१४ पासून सुरू होता. त्याबाबत दोन ते तीन वेळा अंतिम निर्णयदेखील झाला होता. मात्र त्यानंतर भूमिका बदलण्यात आली. काँग्रेसचे सरकार असताना २६/११ चा हल्ला झाला. त्या वेळी पंतप्रधान मनमोहनसिंग होते, तर शरद पवार मंत्रिमंडळात होते. त्या वेळी दहशतवाद्यांवर काहीही कारवाई झाली नाही. पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला. धर्माच्या आधारावर २६ नागरिकांची हत्या करण्यात आली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत काय करू शकतो, हे दाखविले.'सार्वजनिक जीवनात आपण एका निश्चित ध्येयाने, धोरणाने दिवस-रात्र काम करतो आहोत. आपल्या कामातून राज्याचे भले झाले पाहिजे, सर्व क्षेत्रांत राज्य प्रथम क्रमांकावर असले पाहिजे, हा आपला प्रयत्न आहे. हे सगळे ध्येय पूर्ण करायचे असेल, तर सत्ता पाहिजे. सत्ता हे ध्येय नसले, तरी ध्येयप्राप्तीसाठी सत्ता आवश्यक असते, हे वास्तव आपल्याला विसरता येणार नाही,' असे अजित पवार यांनी सांगितले.

### 'ध्येयप्राप्तीसाठी सत्ता आवश्यक'

आपण लोककल्याणाचा ध्यास स्वीकारला आहे. सत्ता येईल, सत्ता जाईल. परंतु, राज्यातील प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी विचार जिवंत राहिला पाहिजे. सत्तेवर असलो, तरी सरकारमधून आणि सत्तेत नसलो, तर रस्त्यांवर संघर्ष करून ही जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. विचारांशी कधीही तडजोड केली जाणार नाही,' असे पवार यांनी सांगितले.

# लोणावळा व मावळातील पर्यटनस्थळांवर प्रतिबंधात्मक बंदीचे आदेश!

## पवना धरणासह एकवीरा देवी, कार्ला, भाजे लेणी, भाजे धबधबा, लोहगड, विसापूर, तिकोणा गडाचा समावेश

। लोणावळा ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोणावळा, खंडाळ्यासह मावळ तालुक्यात पावसाळ्यात वर्षाविहार व पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी, होणारे अपघात तसेच काही उपद्रवी पर्यटकांच्या बेफिकीरीमुळे घडणाऱ्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर लोणावळा शहर व परिसरातील काही पर्यटन स्थळांसह मावळातील काही पर्यटन स्थळांवर कायदा व सुव्यवस्थेचा दृष्टीने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी ७ जून ते ३१ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.**



यामध्ये प्रामुख्याने एकवीरा देवी, कार्ला लेणी, भाजे लेणी, भाजे धबधबा, लोहगड, विसापूर, तिकोणा या गड किल्ल्यांसह, टायगर, लायन्स व शिवलिंग पॉईंट आणि पवनाधरण या पर्यटनस्थळांचा समावेश असुन, येथील धोकादायक ठिकाणी पर्यटनास प्रतिबंधात्मक बंदी घालण्यात आली आहे.

पर्यटकांचे सर्वात आकर्षण असलेले लोणावळ्यातील भुशी धरणाच्या बॅक वॉटर परिसरातील बाजूस असलेल्या धबधब्याच्या पाण्याच्या प्रवाहात गतवर्षी ३० जूनला पुण्यातील हडपसर येथील एकाच कुटुंबातील पाच जणांचा वाहून गेल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पुणे जिल्हाधिकारी व स्थानिक प्रशासनाने लोणावळा, खंडाळा व मावळातील धोकादायक पर्यटनस्थळांवर काही प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करत उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच हुल्लडबाजी, स्टंटगिरी करणारे व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला. चार दिवसांपूर्वी रविवारी दोन पर्यटकांचा भुशी धरणाच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे.

या घटनेसह मागील वर्षी घडलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर वर्षाविहार व पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांमुळे होणारी वाहतूक कोंडी व घडणाऱ्या अपघातांसह काही उपद्रवी पर्यटकांच्या बेफिकीरीमुळे घडणाऱ्या दुर्घटनांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी कार्ला येथील श्री एकवीरा देवी मंदिर, कार्ला व भाजे लेणी, भाजे धबधबा, लोहगड, विसापूर, तुंग व तिकोना या गड किल्ल्यांसह लोणावळा परिसरातील टायगर, लायन्स व शिवलिंग पॉईंट्स, पवना धरण परिसरातील धोकादायक ठिकाणांसह गतवर्षी भुशी धरण परिसरात घडलेल्या मोठ्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भुशी धरणाच्या बॅक वॉटर परिसरातील मागील बाजूस असलेल्या धबधबा परिसरात पर्यटकांना पर्यटनास प्रतिबंधात्मक बंदीचे आदेश दिले आहेत. पर्यटन स्थळांवरील प्रतिबंधात्मक आदेशामुळे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत घट होऊन व्यवसायावर परिणाम होण्याच्या भितीने त्या त्या ठिकाणच्या स्थानिक व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

### प्रशासनाने घातलेली प्रमुख बंधने

*धबधब्यावर किंवा वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उतरून पोहण्यास मनाई.
*धोकादायक ठिकाणी सेल्फी काढणे किंवा चित्रीकरण करू नये.
*नैसर्गिक धबधब्यांजवळ मद्यपान, अनधिकृत मद्यविक्री किंवा मद्य सेवनास बंदी.
* सार्वजनिक ठिकाणी कचरा, प्लास्टिक वस्तू किंवा बाटल्या टाकणे निषिद्ध.
*सार्वजनिक ठिकाणी महिलांशी असभ्य वर्तन किंवा छेडछाड केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.
*सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात गाणी, डीजे वाजविणे आणि ध्वनी प्रदूषणास मनाई
*धबधबे, धरण परिसरात सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशबंदी (आवश्यक सेवेतील वाहन वगळून)
*रस्त्यावर वाहने अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने पार्क करणे किंवा बेदरकार वाहन चालवणे निषिद्ध

# डीपी प्लानबाबत नागरिकांना आक्षेप!

## विकास आराखड्यावर 25 दिवसांत 9 हजारांपेक्षा अधिक हरकती

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराचा सुधारित प्रारूप विकास आराखडा (डीपी प्लान) १४ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. आराखड्यातील आरक्षणांबाबत हरकती घेण्याची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. केवळ २५ दिवसांत तब्बल ९ हजारांपेक्षा अधिक हरकती महापालिकेस प्राप्त झाल्या आहेत.**





पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रासह पिंपरी-चिंचवड विकास प्राधिकरणाकडून वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्राचा एकत्रित प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यातून एमआयडीसी आणि पीएमआरडीएचे क्षेत्र वगळण्यात आले आहे. शहरातील एकूण २८ गावांच्या एकूण १७३.२४ चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या या आराखड्यात शहरातील विविध प्रकल्पांसाठी आरक्षणे टाकण्यात आली आहेत. तसेच सार्वजनिकसेवा व सुविधांसह नवीन प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. आरक्षणाबाबत नागरिकांकडून १६ मे रोजीपासून १४ जुलैपर्यंत असे ६० दिवसांच्या मुदतीमध्ये हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. दिवसेंदिवस हरकतींची संख्या वाढतच चालली आहे. आतापर्यंत ९ हजारांपेक्षा अधिक हरकती पालिकेस प्राप्त झाल्या आहेत.

### तीन ठिकाणी स्वीकारल्या जातात हरकती

विकास योजना आराखड्याबाबत लेखी स्वरूपात सूचना व हरकती महापालिका भवनातील चौथ्या मजल्यावरील आयुक्त कक्ष, तळ मजल्यावरील नगररचना विभागात आणि खराळवाडी, पिंपरी येथील साईकृपा कमर्शियल बिल्डिंगमधील चौथ्या मजल्यावरील विशेष नियोजन प्राधिकरण कार्यालयात स्वीकारण्यात येत आहेत. विहित नमुना अर्ज त्या ठिकाणी मोफत उपलब्ध आहेत. सूचना व हरकती देण्यासाठी १४ जुलैपर्यंत मुदत आहे. अर्जासोबत आवश्यक नकाशे व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

त्यात सर्वाधिक हरकती या चिखली, एचसीएमटीआरचा (रिंगरोड) मार्गिका, मोशीतील कत्तलखाना, थेरगाव, वाल्हेकरवाडी, रहाटणी भागातील प्रस्तावित रस्ते, मोठे मोठे प्रकल्प, व्यापारी संकुल, हरित क्षेत्र कमी करणे आदींसाठी आहेत.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सुखदुःख मनावर अवलंबून आहे.

जिथे रोग असेल तिथेच औषध लावले तर उपयोग होईल. दु:खाचे मूळ कुठे आहे हे प्रथम पहावे. प्रपंचात काही न्यूनता पडली की दु:ख होते. श्रीमंताच्या किंवा गरिबाच्या सुखदु:खात तसा फरक तो कोणता ? एखाद्याजवळ पैसा पुष्कळ आहे परंतु मूलबाळ नाही म्हणून तो दु:खी असतो; तर दुसऱ्याला संतती आहे पण पैसा नाही, म्हणून तो कष्टी होतो. तिसऱ्याला संतती, संपत्ती वगैरे सर्व आहे परंतु पोटदुखीच्या विकाराने तो बेजार आहे. एकंदरीत सुखदु:खे कोणालाही सुटली नाहीत. जितक्या गोष्टी कमी पडल्या तितक्या प्रयासानेसुद्धा आणल्या तरी पण न्यूनता काही सरत नाही. दु:खावर आपण वरवर उपाय करतो परंतु आपल्या दु:खाच्या मुळाशी आपले मनच आहे हे नाही आपल्या ध्यानात येत. खरोखर, सुखदु:ख हे वस्तूत नसून आपल्या मन:स्थितीवरच अवलंबून आहे. वस्तू चोरीला गेली त्या वेळी झोपेत, आनंदात होता; पण जागे झाल्यावर, वस्तू गेल्याचे समजल्यावर दु:खी झाला. म्हणजे दु:खी होते ते मन. तेव्हा औषध द्यायचे ते मनाला द्या. संतांनी मनाला शिकवण दिली. आजवर आम्ही विषयसुख सख्ख्या मुलाप्रमाणे भोगले, आणि परमार्थ सावत्र मुलासारखा केला. सावत्र आईप्रमाणे आम्ही मनाला शिकविले. ज्याचा सहवास झाला, त्याप्रमाणे मनावर परिणाम होऊ लागले. विषयाचा सहवास गर्भापासून आपण ठेवतो, म्हणून विषयापासून मिळणारा आनंद खरा असे मानू लागलो. ज्याचे बीज लावावे त्याची फळे खावी. आपण विषयाचे बी पेरतो, आणि विषयाची फळे दु:खदायक आहेत म्हणून मग शोक करतो, याला काय करावे ? व्यापारी दरवर्षी आढावा घेतात त्याप्रमाणे, माझे विषय किती कमी झाले हे आपण पहावे. जितकी प्रपंचाकरिता तळमळ करतो, तितकी भगवंताकरिता करावी. प्रपंचातल्या अनुकूल परिस्थितीपेक्षा प्रतिकूल परिस्थिती हीच परमार्थाला जास्त उपकारक आहे. परमार्थ हा परिस्थितीवर, श्रीमंती-गरिबीवर, रोगी-निरोगीपणावर वगैरे कशावरही अवलंबून नाही. मनाची स्वस्थता, अंत:शुद्धता, आचरणाची पवित्रता यांवर तो अवलंबून आहे. प्रपंचातल्या सोयी आणि गैरसोयी या दोन्ही परमार्थाच्या आड येतात. आपण रस्त्यातून चाललो असताना, एखादे अत्तराचे दुकान पाहून थांबलो काय किंवा मिरच्यांचे दुकान पाहून थांबलो काय, रस्ता चालण्याच्या दृष्टीने दोन्ही घातकच ठरतात. प्रपंच मुळात चांगलाही नाही आणि वाईटही नाही, आपण आपली आसक्ती त्यात कालवतो म्हणून आपल्याला तो सुखदु:ख देतो. ही आसक्ती काढणे याचेच नाव परमार्थ होय.

बोधवचन:- त्याच गोष्टी 'आसक्ति' सोडून करणे याचे नाव परमार्थ.



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# देशाच्या चौफेर सुरक्षेसाठी केंद्रात खंबीर सरकारच हवे !

**आज अकरा वर्षांपूर्वीचा आपला देश आठवतो. भारतात नियमितपणे कोणत्या ना कोणत्या भागात बॉम्बस्फोट व्हायचे. कोणतीही कारवाई नाही. फक्त शेजारील राष्ट्राचा निषेध केला जायचा.. काँग्रेसवाले तर पाकिस्तानचे नाव घ्यायला सुद्धा घाबरायचे.. तोपर्यंत पाकड्यांची ही हरामखोरी आहे, घरात घुसून मारू, असे म्हणण्याची एकाही राजकारण्याची खासगीत सुद्धा म्हणायची हिम्मत नसायची !**



### मोदी आले पण सगळंच बदललं..

आज सत्तेवर येऊन नरेंद्र मोदींना अकरा वर्षे पूर्ण झाली. तमाम भारतीयांनी मोठा विश्वास टाकून त्यांना तिसऱ्यांदा कौल दिला. पण, या अकरा वर्षात सर्व आघाड्यांवर त्यांनी भारताचं रुपडं पालटवून दाखवलं ! विज्ञान-तंत्रज्ञानापासून आर्थिक सुबत्तेपर्यंत आणि प्रशासनापासून संरक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्र आज अतिशय सक्षम, कार्यक्षम, पारदर्शक आणि आत्मनिर्भर होत चालले आहे, हे मान्य करावेच लागेल !

### मोदींनी सांगितलेल्या चार जाती..

मी जातीयवादी आहे आणि चार जातींसाठी काम करणार असे एकदा मोदी बोलून गेले होते, त्यांच्यासाठी मोदींचे चौफेर काम सुरू आहे. बळीराजा, महिला, युवा आणि देशातील गोरगरीब हे त्यामुळेच मोदींना दुवा देत आहेत. 'न थकता, न चुकता, न झुकता' फक्त देशाचे भले हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून अहोरात्र काम करणारा आमचा पंतप्रधान.. खरोखर कोटी कोटी प्रणाम, मोदीजी !

### नरेंद्र मोदी चुकत आहेत का?

पण, देशाचा विकास उघड्या डोळ्यांनी पाहत असताना कधी कधी असा प्रश्न येऊन जातो, की नरेंद्र मोदी बऱ्याचदा चुकत आहेत का? काँग्रेसच्या लोकांना भाजपात सामील करणं, इतर पक्ष फोडणं, काँग्रेस संपवण्याचं पाऊल टाकणं.. अशा घटना घडल्या की उगीचंच वाटतं.. दया दालमें कुछ काला हैं !

### अटलजींसारखा आदर्श नेता !

हे सगळे पाहून अटलजींसारख्या आदर्श नेत्याची आठवण येते, आणि मग मोदी कुठेतरी चुकत आहे, असे वाटून जाते. स्वतःविषयी एक आदर्श मत तयार करण्यात कठोर निर्णयामुळे मोदींना अपयश येते आणि मग विरोधकांच्या हातात टीकेशिवाय दुसरे काहीच राहत नाही !

### राजकीय तज्ज्ञामुळे दृष्टिकोन बदलला..

या संदर्भात टीव्हीवर एक उत्तम चर्चासत्र झाले, त्यातील काही राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केलेली मते एवढी मनाला पटली, की मोदी करत आहेत,ते बरोबरच आहे, असे वाटू लागले.

### महत्त्वाच्या शंकांचे निरसन..

नीतीश कुमार यांच्यासोबत पुन्हा एकत्र येणं मला अयोग्य वाटलं होतं. त्या चर्चासत्रातील एक जण इंटेलिजन्स विभागातून निवृत्त झालेला अधिकारी होता. त्याचे म्हणणे शंभर टक्के पटले. माझ्या इतक्या वर्षांच्या नोकरीत, गेल्या ६-७ वर्षांत मी प्रथमच निश्चिंत झालो आहे, की माझ्या मुलीचं भविष्य सुरक्षित आहे, असं तो सांगून गेला. त्यानं पश्चिम बंगाल, जम्मू काश्मीर, आसाम, अरुणाचल, महाराष्ट्र, केरळ, तेलंगणा, कर्नाटका, तामिळनाडू, बिहार, उत्तरप्रदेश या राज्यांमधील अंतर्गत स्थिती सांगितली आणि जे काही सांगितलं, त्यानं माझे डोळे खाडकन उघडले !

### मुस्लिम राष्ट्र बनवण्याचे कारस्थान..

त्या अधिकाऱ्यांनं सांगितलं, की भारताला पूर्णपणे मुस्लिम राष्ट्र बनवण्याचं कट-कारस्थान इंदिरा गांधींच्या काळापासूनच चालू होतं, पण खऱ्या अर्थानं यश २००४–२०१४ या डॉ. मनमोहन सिंहांच्या कार्यकाळात मिळालं. काँग्रेसची कपटनीती नरेंद्र मोदींच्या कूटनीतीमुळे चव्हाट्यावर आली आणि मोदींनी ती संपवली. अतिशय कटू सत्य तो अधिकारी सांगत होता.

### मुस्लिम गुंडांची दहशत..

वरील सर्व राज्यांत मुस्लिम गुंड खुलेआम दहशत माजवत होते, बलात्कार, अमली पदार्थ यांचा सुळसुळाट होता. या प्रकारची सर्व माहिती आमच्याकडे यायची, पण, शासनाकडून कोणतीही कारवाई होत नसे. आम्हाला शांत बसावं लागायचं, आमचे हात बांधलेले होते, असे तो इंटेलिजन्स चा अधिकारी स्पष्टपणे बोलत होता.

### हिंदूंमध्ये प्रतिकार करण्याची ताकद नव्हती..

या राज्यांतील हिंदू भीतीमुळे चूप बसत, त्यांच्या बहिणी-मुलींचा अपमान झाला तरीही! प्रतिकार करण्याची ताकद नव्हती त्यामुळे ते स्थलांतर करत. पश्चिम बंगालमधील संदेशखालीचा उल्लेख त्यांनी केला, आणि ते सत्य असेच वास्तव ऐकताना चीड येऊन हाताच्या मोठी वळू लागल्या ! त्याने सांगितले, आजही तुम्ही गूगल सर्च करा, दरवर्षी देशभरातून किती मुली गायब होतात ते ! त्यात ९५ टक्के हिंदू आणि ३ टक्के ख्रिश्चन किंवा शीख असतात, ही वस्तुस्थिती आहे.

### लव्ह जिहादनंतर थांगपत्ता नाही..

लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकलेल्या हिंदू मुलींचा पुढे थांगपत्ताही लागत नाही. हत्या करून त्यांच्या अवयवांची तस्करी चेन्नई, बंगाल, बिहारमार्गे नेपाळ आणि श्रीलंकेत केली जाते, आणि हे सर्व अधिकाऱ्यांना तसेच राजकारण्यांनाही माहीत होते. पण सगळ्यांची या विषयावर चुप्पी !

### काही शहरे तर मिनी पाकिस्तान..

नरेंद्र मोदी यांचे राज्य सुरू झाले आणि पहिल्या कार्यकाळात आम्हाला हिम्मत मिळाली. आम्ही खुल्या दिलाने माहिती द्यायला लागलो. काही गद्दार होते, पण तरीही पुढे गेलो, आमची माहिती ऐकून घेतले गेली आणि लगेच पावले देखील उचलली गेली.

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महापूर टाळण्यासाठी कोटींचा प्रकल्प

## 500 कोटींच्या निविदा काढण्यात येईल : राजेश क्षीरसागर

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महापूर हानी टाळण्यासाठी जागतिक बँकेच्या माध्यमातून शासन ३२०० कोटींचा प्रकल्प राबवत आहे. यातील पहिल्या टप्प्यातील ५०० कोटींच्या कामाची निविदा लवकरच काढण्यात येईल, असे राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अधिकारी राजेश क्षीरसागर यांनी सांगितले.**



पूरनियंत्रण प्रकल्प व विविध विकासकामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी अशोक काकडे, महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.आयटी सेक्टरला चालना देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे सांगून क्षीरसागर म्हणाले, येथील आयटी इंजिनियर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नोकरीसाठी बाहेर जावे लागते. सांगलीला आयटी क्षेत्र चांगल्या पध्दतीने विकसित करण्यासाठी प्रयत्न करू. आयटी कंपन्या येण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यासाठी जागा निवडावी. यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. पर्यटनाला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, त्यामुळे रोजगार उपलब्धता होईल.

सौरऊर्जेवर उद्योगधंद्याना वीजपुरवठा यासाठी लवकरच धोरण आखत असल्याचे ते यावेळी म्हणाले.यावेळी त्यांनी ग्रीस्टॅक योजना, सौरऊर्जेव्दारे कृषिपंपाना वीजपुरवठा, केंद्र शासनाची एक जिल्हा एक निर्यात उत्पादन योजना, कृषी, पर्यटन अशा विविध क्षेत्रात विकास साधण्यासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न, कोविड, पाणीपुरवठा व्यवस्था, नावीण्यपूर्ण योजनेतून करण्यात येत असलेली कामे, कोविड आदी विषयांचा सविस्तर आढावा घेतला. यावर जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी ग्रीस्टॅक योजना, पर्यटन, नावीण्यपूर्ण योजना अंतर्गत करण्यात येत असलेले प्रयत्न आदीबाबत सविस्तर माहिती देऊन जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने जिल्हा विकास आराखड्यात समावेश केलेल्या विविध बाबींबाबत माहिती दिली. पूरनियंत्रण प्रकल्प व विविध विकासकामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी अशोक काकडे, महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.आयटी सेक्टरला चालना देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे सांगून क्षीरसागर म्हणाले, येथील आयटी इंजिनियर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नोकरीसाठी बाहेर जावे लागते. सांगलीला आयटी क्षेत्र चांगल्या पध्दतीने विकसित करण्यासाठी प्रयत्न करू. त्यासाठी जागा निवडावी. यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. पर्यटनाला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, त्यामुळे रोजगार उपलब्धता होईल.

### 3200 कोटींचा प्रकल्प

सौरऊर्जेवर उद्योगधंद्याना वीजपुरवठा यासाठी लवकरच धोरण आखत असल्याचे ते यावेळी म्हणाले.यावेळी त्यांनी ग्रीस्टॅक योजना, सौरऊर्जेव्दारे कृषिपंपाना वीजपुरवठा, केंद्र शासनाची एक जिल्हा एक निर्यात उत्पादन योजना, कृषी, पर्यटन अशा विविध क्षेत्रात विकास साधण्यासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न, कोविड, पाणीपुरवठा व्यवस्था, नावीण्यपूर्ण योजनेतून करण्यात येत असलेली कामे, कोविड आदी विषयांचा सविस्तर आढावा घेतला. पर्यटन, नावीण्यपूर्ण योजना अंतर्गत करण्यात येत असलेले प्रयत्न आदीबाबत सविस्तर माहिती देऊन जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने जिल्हा विकास आराखड्यात समावेश केलेल्या विविध बाबींबाबत माहिती दिली.महापूर हानी टाळण्यासाठी जागतिक बँकेच्या माध्यमातून शासन ३२०० कोटींचा प्रकल्प राबवत आहे.

# शेती नसणाऱ्यांना पीकहानी अनुदान

## जालना जिल्हयातील दोन तालुक्यांत 35 कोटींचा अपहार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**अतिवृष्टी, गारपीट इत्यादींमुळे जालना जिल्हयातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यांत वितरित करण्यात आलेल्या पीकहानी अनुदानात जवळपास ३५ कोटी रुपयांचा अपहार झाल्याचे यासंदर्भातील चौकशी समितीच्या अहवालात समोर आले आहे. यापैकी २३ कोटी ६९ लाख रूपये अनुदान शेती नसणारांना वितरित झालेले आहे.**



नोव्हेंबर २०२२ ते डिसेंबर २०२४ दरम्यानच्या चार शासन निर्णयांद्वारे वितरित झालेल्या या अनुदानाच्या गैरप्रकाराबाबत राज्य शासनाकडे तक्रारी आल्यानंतर यासंदर्भात चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे .या समितीने दोन तालुक्यांतील अनुदान वितरणाची सांख्यिकीय चौकशी आतापर्यंत केली असून जिल्ह्यातील अन्य सहा तालुक्यांची चौकशी सुरु आहे.यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी वार्ताहरांना सांगितले की, अंबड आणि घनसावंगी तालुक्यांत एकूण ३४ कोटी ९७ लाख ३ हजार ३३४ रुपयांचे अतिप्रदान झाल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. वितरित झालेल्या ७९ कोटी पैकी ७२ कोटी रुपयांची तपासणी आतापर्यंत झाली आहे. वितरित झालेल्यापैकी ५ कोटी ७४ लाख रुपये पीकहानी अनुदान शासनाकडे परत करण्यात आले आहे.अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील संबंधित २६ तलाठी, १७ कृषी सहाय्यक आणि ३१ ग्रामसेवक या संदर्भात दोषी आढळले असून त्यांना खुलासा करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.शासकीय जमीनीवर शेती दाखविणारांना ३ लाख ४९ हजार रुपये, क्षेत्रवाढ दाखविणारांना १ कोटी १८ लाख रुपये पीकहानी अनुदान वाटप झाल्याचे चौकशीत समोर आले आहे. तर जवळपास दहा कोटी रुपयांचे अनुदान दुबार वाटप झाल्याचे चौकशीत समोर आले आहे या अनुदानाच्या गैरप्रकाराबाबत राज्य शासनाकडे तक्रारी आल्यानंतर यासंदर्भात चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे .

### 31 ग्रामसेवक दोषी आढळले

या समितीने दोन तालुक्यांतील अनुदान वितरणाची सांख्यिकीय चौकशी आतापर्यंत केली असून जिल्ह्यातील अन्य सहा तालुक्यांची चौकशी सुरु आहे.यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी वार्ताहरांना सांगितले की, अंबड आणि घनसावंगी तालुक्यांत एकूण ३४ कोटी ९७ लाख ३ हजार ३३४ रुपयांचे अतिप्रदान झाल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. वितरित झालेल्या ७९ कोटी पैकी ७२ कोटी रुपयांची तपासणी आतापर्यंत झाली आहे. वितरित झालेल्यापैकी ५ कोटी ७४ लाख रुपये पीकहानी अनुदान शासनाकडे परत करण्यात आले आहे.अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील संबंधित २६ तलाठी, १७ कृषी सहाय्यक आणि ३१ ग्रामसेवक या संदर्भात दोषी आढळले असून त्यांना खुलासा करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा चीनशी करार!

## खनिजांच्या बदल्यात चीनी विद्यार्थ्यांना मिळणार अमेरिकेत एंट्री

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिका आणि चीन यांच्यात एक नवीन व्यापारी करार झाला आहे, ज्या अंतर्गत अमेरिका आता चीनला दुर्मिळ खनीजे (RARE EARTH MINERALS) आणि मॅग्नेट्स खरेदी करेल. तर या बदल्यात चीनी विद्यार्थ्यांना अमेरिकेतली महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये प्रवेश घेता येईल, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी याबद्दलची घोषणा केली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून अमेरिका आणि चीन यांच्यात व्यापार युद्ध सुरू होते, यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांमधील संबंध उत्कृष्ट असल्याचे म्हटले आहे.**




आपल्याला एकूण ५५ टक्के कर मिळत आहे, चीनला १० टक्के मिळत आहेत. दोन्ही देशातील संबंध उत्कृष्ट आहेत!" अशी पोस्ट ट्रम्प यांनी ट्रूथ सोशलवर केली आहे. असे असले तरी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प असेही म्हणाले आहेत की त्यांच्या आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या मंजूरीनंतर पूर्ण होईल.रॉयटर्सने दिलेल्या रिपोर्टनुसार, व्हाईट हाऊस अधिकाऱ्यांनी सांगितले की, या करारानंतर अमेरिका आयात केलेल्या चिनी वस्तूंवर ५५ टक्के कर आकारेल. ज्यामध्ये १० टक्के बेसलाईन रेसिप्रोकल टॅरिफ, फेंटानील तस्करीसाठी २० टक्के आणि आधीपासून अस्तित्वात असलेला २५ टक्के कर यांचा समावेश आहे. तर चीन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालावर १० टक्के कर आकारेल.फुल मॅग्नेट आणि कोणत्याही आवश्यक रेयर अर्थ्स यांचा चीनकडून पुरवठा केला जाईल. याबरोबरच आम्ही मान्य केलं होतं त्याचा पुरवठा चीनला करू, ज्यामध्ये चिनी विद्यार्थी वापर करत असलेली (जे मला आधीपासूनच मान्य आहे!) आमची महाविद्यालये आणि विद्यापीठांचा समावेश आहे," असे ट्रम्प म्हणाले आहेत.अमेरिकन आणि चिनी अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले की, त्यांच्यात थांबलेल्या व्यापारी कराराचे पुनरुज्जीवन करण्याच्या आराखड्यावर सहमती झाली आहे. ज्यामध्ये चीनने रियर अर्थ इलेमेंट्सच्या निर्यातीवर लावलेली बंधने काढून टाकण्याचा देखील समावेश आहे. मात्र या करारामध्ये दोन्ही देशांमधील व्यापारी तणाव कमी करण्याच्या उद्देशाने दीर्घकालीन उपाय दिसून आले नाहीत. आपल्याला एकूण ५५ टक्के कर मिळत आहे, चीनला १० टक्के मिळत आहेत. दोन्ही देशातील संबंध उत्कृष्ट आहेत!" अशी पोस्ट ट्रम्प यांनी ट्रूथ सोशलवर केली आहे. असे असले तरी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प असेही म्हणाले आहेत की त्यांच्या आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या मंजूरीनंतर पूर्ण होईल.रॉयटर्सने दिलेल्या रिपोर्टनुसार, व्हाईट हाऊस अधिकाऱ्यांनी सांगितले की, या करारानंतर अमेरिका आयात केलेल्या चिनी वस्तूंवर ५५ टक्के कर आकारेल. ज्यामध्ये १० टक्के बेसलाईन रेसिप्रोकल टॅरिफ, फेंटानील तस्करीसाठी २० टक्के आणि आधीपासून अस्तित्वात असलेला २५ टक्के कर यांचा समावेश आहे. तर चीन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालावर १० टक्के कर आकारेल.फुल मॅग्नेट आणि कोणत्याही आवश्यक रेयर अर्थ्स यांचा चीनकडून पुरवठा केला जाईल. याबरोबरच आम्ही मान्य केलं होतं त्याचा पुरवठा चीनला करू, ज्यामध्ये चिनी विद्यार्थी वापर करत असलेली (जे मला आधीपासूनच मान्य आहे!) आमची महाविद्यालये आणि विद्यापीठांचा समावेश आहे," असे ट्रम्प म्हणाले आहेत.

### व्यापारी कराराचे पुनरुज्जीवन

अमेरिकन आणि चिनी अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले की, त्यांच्यात थांबलेल्या व्यापारी कराराचे पुनरुज्जीवन करण्याच्या आराखड्यावर सहमती झाली आहे. ज्यामध्ये चीनने रियर अर्थ इलेमेंट्सच्या निर्यातीवर लावलेली बंधने काढून टाकण्याचा देखील समावेश आहे. मात्र या करारामध्ये दोन्ही देशांमधील व्यापारी तणाव कमी करण्याच्या उद्देशाने दीर्घकालीन उपाय दिसून आले नाहीत. अमेरिका आणि चीन यांच्यात एक नवीन व्यापारी करार झाला आहे, ज्या अंतर्गत अमेरिका आता चीनला दुर्मिळ खनीजे आणि मॅग्नेट्स खरेदी करेल. तर या बदल्यात चीनी विद्यार्थ्यांना अमेरिकेतली महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये प्रवेश घेता येईल.

# उपेंद्र कुशवाहांकडूनही दबावाचे राजकारण

## बिहारमधील राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**यावर्षी होऊ घातलेल्या बिहार निवडणुकीसाठी भाजपाने जोरदार तयारी सुरू केली आहे. एनडीएमधील घटक पक्षांना बरोबर घेऊन भाजपा पुढे जात असताना आता जागावाटपासंदर्भात काही आव्हाने निर्माण होण्याची शक्यता आहे. बिहारमधील घटकपक्ष आपापली ताकद दाखवून अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. बिहारमध्ये सध्या जनता दल संयुक्त पक्षाच्या नेतृत्वाखालचे सरकार आहे.**



भाजपा आणि जेडीयूबरोबर एनडीएत केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांचा लोजप (रा), केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी यांचा 'हम' आणि राज्यसभा खासदार उपेंद्र कुशवाहा आहेत.भाजपा आणि जेडीयू हे प्रमुख पक्ष असल्यामुळे त्यांच्या पारड्यात अधिक जागा पडतील, असे मानले जाते. मात्र इतर पक्ष अधिकाधिक जागा मिळविण्यासाठी आता आक्रमक प्रतिक्रिया देऊ लागले आहेत. या प्रतिक्रियामधून भाजपा-जेडीयूवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.लोक जनशक्ति पक्षाचे (रामविलास) प्रमुख आणि केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी काही दिवसांपूर्वी आरा येथे झालेल्या जाहीर सभेत त्यांच्यात बराच दम असल्याचे म्हटले. उपस्थितांच्या उत्साही प्रतिसादामुळे चिराग पासवान उस्फुर्तपणे राज्यातील सर्व २४३ जागांवर निवडणूक लढविणार असल्याचे बोलून गेले. तसेच एनडीएला आणखी बळकट करण्यासाठीच आपण हा निर्णय घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले.यासाठी केल्याचे म्हटले जाते.चिराग पासवान यांच्या पक्षाचे पाच खासदार बिहारमध्ये आहेत. त्यांच्या जोरावर अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्याचा पासवान यांचा प्रयत्न आहे. निवडणुकीपूर्वी राज्यात मोठी राजकीय खेळी करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला हम पक्षाचीही अशीच स्थिती आहे. राज्यातील महादलित मतदारांच्या पाठिंब्यासाठी त्यांचा पक्ष कमीत कमी ३० जागांवर निवडणूक लढवू इच्छितो.

### जागावाटपासंदर्भात आव्हाने

महादलित समुदायाच्या विकासासाठी त्यांच्या पक्षाचे २० आमदार विधानसभेत असणे आवश्यक आहे, असे ते अनेकदा बोलले आहेत. वीस आमदार निवडून आणण्यासाठी त्यांना कमीत कमी ३० ते ३५ जागांवर लढावे लागणार आहे. हम पक्षातील इतर अनेक नेत्यांनी एवढ्या जागा मिळाव्यात, यासाठी प्रतिक्रिया दिल्या आहेत.राष्ट्रीय लोक मोर्चाचे (रालोमो) प्रमुख आणि राज्यसभेचे खासदार उपेंद्र कुशवाहा यांचाही पक्ष एनडीएचा घटक आहे. रालोमो पक्षाचा एकही आमदार सध्या बिहार विधानसभेत नाही. कुशवाहा यांचा पक्ष किती जागा लढविणार हे त्यांनी जाहीर केले नसले तरी त्यांच्या पक्षाचे नेते अधिक जागा मिळविण्यासाठी दबाव टाकत आहेत.

# धनुषने सात तास केले कचऱ्याच्या ढिगाऱ्यात शूटिंग




रश्मिका मंदाना सध्या तिच्या आगामी 'कुबेरा' चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाद्वारे ती पहिल्यांदाच धनुष आणि नागार्जुनबरोबर स्क्रीन स्पेस शेअर करताना दिसणार आहे. अशा परिस्थितीत ती चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. त्याचे प्रमोशन चेन्नई येथून सुरू झाले आहे. दरम्यान, कालच (१० जून) चित्रपटाचा ऑडिओ लाँच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये चित्रपटातील तिन्ही स्टार्सनी भाग घेतला आणि त्याबद्दलचे त्यांचे अनुभव शेअर केले. दरम्यान, धनुषने अभिनेत्रीबद्दल खुलासा केला की, त्याला आणि रश्मिकाला ६-७ तास कचऱ्याच्या ढिगाऱ्यात राहावे लागले. त्याने रश्मिकाचे कौतुकही केले आणि म्हटले की तिला साधेपणाने संस्कार मिळाले आहेत.'कुबेरा' चित्रपटातील 'पिप्पी पिप्पी डम डम डम' या गाण्याचा लाँचिंग कार्यक्रम मुंबईत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात धनुषने चित्रपटाच्या शूटिंगचा अनुभव सांगितला आणि सांगितले की, त्याने आणि रश्मिका मंदानाने सुमारे ६-७ तास कचऱ्याच्या ढिगाऱ्यात चित्रपटाचे शूटिंग केले. या अनुभवाबद्दल बोलताना दाक्षिणात्य अभिनेत्याने पुढे सांगितले की, शूटिंगदरम्यान रश्मिका पूर्णपणे ठीक होती. तिला हा सीन करताना कोणतीही अडचण आली नाही, उलट ती म्हणत होती की तिला त्याचा वास येत नव्हता. धनुष इथेच थांबत नाही.

## मृण्मयीचे नितीश बद्दल वक्तव्य



'लाखात एक आमचा दादा' या मालिकेत नितीश चव्हाण व मृण्मयी गोंधळेकर हे कलाकार प्रमुख भूमिकेत काम करताना दिसत आहे. या कलाकारांनी त्यांच्या भूमिकांतून प्रेक्षकांची मने जिंकली. नितीश चव्हाणने या मालिकेत सूर्या दादा ही भूमिका साकारली आहे. तर अभिनेत्री मृण्मयी गोंधळेकरने तुळजाची म्हणजेच सूर्याच्या पत्नीची भूमिका साकारली आहे. सूर्या त्याच्या बहिणींवर तसेच त्याच्या कुटुंबावर जीवापाड प्रेम करतो. त्याच्या बहिणींना सांभाळतो, त्याच्या पत्नीला तुळजाला जीव लावतो. तुळजादेखील त्याला साथ देताना दिसते. त्याच्या कुटुंबाला तिने मनापासून आपलंस मानलं आहे. सूर्याच्या बहिणींना आईची माया देतो. वेळोवेळी त्यांना पाठिंबा देते.आता एका मुलाखतीत अभिनेत्री मृण्मयी गोंधळेकरने तिच्या सहकलाकाराबद्दल म्हणजेच नितीश चव्हाणबद्दल वक्तव्य केले आहे. नितीश चव्हाण व मृण्मयी गोंधळेकर यांनी नुकताच तारांगणशी संवाद साधला. यावेळी मृण्मयी गोंधळेकर म्हणाली, "नितीश एक उत्तम कलाकार आहे. तो अष्टपैलू अभिनेता आहे.

## अविकाने बॉयफ्रेंडशी केला साखरपुडा

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री अविका गौर ही तिच्या नवनवीन भूमिकांमुळे चर्चेत असते. 'बालिका वधू' या मालिकेतून अभिनेत्री घराघरांत पोहोचली होती. आता मात्र ती तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आहे.अविका गौर व बॉयफ्रेंड मिलिंद चंदवानी यांचा साखरपुडा पार पडला आहे. दोघेही बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत होते. अविका अनेकदा त्यांच्या नात्याबद्दल वक्तव्य केले होते. त्यांच्या नात्याची चर्चादेखील झाली.आता अविकाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर काही फोटो शेअर केले आहेत. ज्यामध्ये ते दोघेही पारंपारिक वेशभूषेत दिसत आहेत. तसेच दोघेही आनंदी असल्याचे दिसत आहेत. हे फोटो शेअर करताना अविकाने लिहिले, "त्याने मला लग्नासाठी विचारले. मी हसले, रडले त्यानंतर मी होकार दिला. हा माझ्या आयुष्यातील सर्वात सोपा होकार होता."पुढे अविकाने असेही लिहिले की मी खूप फिल्मी आहे. बॅकग्राऊंडला म्युझिक वाजत होते. तो शांत आहे, तर्कशुद्धपणे बोलतो. मी काहीतरी ड्रामा व्हावा असा विचार करते आणि तो ते सांभाळून घेतो. असेच आम्ही एकमेकांसाठी योग्य आहोत. जेव्हा त्याने मला लग्नासाठी विचारले तेव्हा माझ्यातील नायिका जागी झाली. हात हवेत असल्यासारखे वाटत होते, डोळ्यात अश्रू येत होते आणि मनात कोणताही विचार उरला नाही." अविकाने हे सर्व जादूसारखे आहे, असे लिहित साखरपुडा झाल्याचे जाहीर केले आहे.अविकाच्या या पोस्टवर मिलिंद चंदवानीने कमेंट करत लिहिले, "माझे हृदयाची धडधड वाढली होती, हे खरे बॅकग्राऊंड म्युझिक होते. तू हो म्हणालीस आणि अचानक प्रत्येक फिल्मी वाक्य अर्थपूर्ण वाटू लागले. तू ड्रामा करतेस, मी दिग्दर्शक आहेस, आपण दोघे मिळून सर्वोत्तम चित्रपट बनवू."अविका गौर आणि मिलिंद यांनी २०२० मध्ये डेट करण्यास सुरू केली. सुमारे ५ वर्षे डेट केल्यानंतर दोघांनीही लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. तसे, अविकाने आधीच अनेक मुलाखतींमध्ये तिच्या लग्नाच्या कल्पनांबद्दल सांगितले आहे. अविका गौरच्या टीव्ही मालिकांबरोबरच दक्षिण आणि हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे.छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री अविका गौर ही तिच्या नवनवीन भूमिकांमुळे चर्चेत असते. 'बालिका वधू' या मालिकेतून अभिनेत्री घराघरांत पोहोचली होती. आता मात्र ती तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आहे. अविका गौर व बॉयफ्रेंड मिलिंद चंदवानी यांचा साखरपुडा पार पडला आहे. दोघेही बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत होते. अविका अनेकदा त्यांच्या नात्याबद्दल वक्तव्य केले होते. त्यांच्या नात्याची चर्चादेखील झाली.आता अविकाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर काही फोटो शेअर केले आहेत. ज्यामध्ये ते दोघेही पारंपारिक वेशभूषेत दिसत आहेत. तसेच दोघेही आनंदी

## शेकी शेकी'वर थिरकल्या अभिनेत्री

मराठीतील प्रसिद्ध गायक संजू राठोडचं 'एक नंबर, तुझी कंबर... हाय चाल शेकी शेकी' हे गाणं गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. संजूच्या या गाण्याला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळत आहे. यूट्यूबवरही या गाण्याला लाखोंमध्ये व्ह्यूज आहेत. इन्स्टाग्रामवर तर हे गाणं सध्या बरंच ट्रेंडिंगमध्ये आहे. अनेक नेटकरी या गाण्यावर थिरकत आहेत. तसंच बरेच सेलिब्रिटीही संजूच्या या गाण्यावरच डान्स करत आहेत. बॉलीवूडसह मराठी कलाकारही या गाण्यावर डान्स करत खास व्हिडीओ शेअर करत आहेत आणि या डान्सचे व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत आहेत. मराठी मालिका विश्वातील अनेक अभिनेत्रींनी संजूच्या 'शेकी शेकी' गाण्यावरचे अनेक व्हिडीओ शेअर केले आहेत. अशातच कलर्स मराठीच्या 'इंद्रायणी' मालिकेतील नायिकांनी या गाण्यावर हटके डान्स व्हिडीओ शेअर केला आहे.कलर्स मराठीवरील 'इंद्रायणी' या मालिकेतील अभिनेत्रींनी 'शेकी शेकी' गाण्यावरचा डान्स व्हिडीओ शेअर केला आहे. अभिनेत्री कांची शिंदे (इंदू), समृद्धी दांडगे (करिश्मा), सायली देशमुख (नारायणी), अपूर्वा चौधरी या अभिनेत्रींनी संजूच्या ट्रेंडिंग गाण्यावर डान्स व्हिडीओ केला आहे. मालिकेत नुकतंच इंदूचं लग्न झालं आणि या लग्नानंतर आनंदात त्यांनी हा डान्स व्हिडीओ शेअर केला आहे.'इंद्रायणी' मालिकेतील अभिनेत्रींच्या 'शेकी शेकी' गाण्याच्या या व्हिडीओला नेटकऱ्यांनी लाईक्स आणि कमेंट्स करत चांगलाच प्रतिसाद दिला आहे. 'सुंदर', 'मस्त', 'छान', 'भारी' अशा अनेक प्रतिक्रिया चाहत्यांनी या व्हिडीओवर व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, इंद्रायणी' मालिकेत नुकतंच इंदू आणि अधू यांचं लग्न पार पडलं. लग्नासाठी इंदूने खास मराठमोळा लूक केला



## पारू'ने सेटवरच साजरी केली वटपौर्णिमा!

सध्याच्या काळात छोट्या पडद्यावरील मालिकांचं प्रक्षेपण आठवड्याचे सहा ते सात दिवस केलं जातं. दैनंदिन एपिसोड, १ तासांचे महाएपिसोड, जवळपास आठवडाभर चालणारा दोन मालिकांचा महासंगम यामुळे कलाकारांना सुट्ट्या मिळत नाहीत आणि यामुळे सगळेच कलाकार खूप व्यग्र असतात. शूटिंग लोकेशन घरापासून दूर असल्यास अनेकदा कलाकारांना सण-उत्सव साजरे करण्यासाठी घरी जाणंही शक्य होत नाही. घराघरांत लोकप्रिय झालेल्या 'पारू'ने यंदा सेटवरच वटपौर्णिमा साजरी केली. विवाहित स्त्रिया वटपौर्णिमेचा सण मोठ्या हौसेने साजरा करतात. स्त्रिया नटून-थटून तयार होतात, वडाभोवती सात फेरे घेतात. यंदा अनेक मराठी अभिनेत्रींनी वटपौर्णिमा साजरी केली. मात्र, 'पारू' मालिकेत काम करणाऱ्या अभिनेत्री शरयू सोनावणे हिने सेटवरच हा सण साजरा केला.वटपौर्णिमेच्या पूजेचा व्हिडीओ शेअर करत अभिनेत्रीने यावर "ऑन सेट" व असे हॅशटॅग दिल्याचं पाहायला मिळत आहे. शरयूच्या नवऱ्याचं नाव जयंत लाडे असं आहे. जयंत मराठी सिनेसृष्टीत काम करत असून तो एक फिल्ममेकर, निर्माता आहे. अभिनेता उमेश कामत, पुष्कर श्रोत्री आणि स्पृहा जोशी अभिनीत 'अ पेईंग घोस्ट' चित्रपटाच्या निर्मातीची धुरा जयंतने सांभाळली होती. याशिवाय उपेंद्र लिमये, प्रवीण तरडे, संजय जाधव, भरत गणेशपुरे अभिनीत 'सूर सपाटा' या चित्रपटाची निर्मिती देखील शरयूच्या नवऱ्याने केली होती.

# स्मिथने मोडला 99 वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड

## ऑस्ट्रेलियाचा फलंदाज बार्डस्लेचा रेकॉर्ड मोडून काढला

**। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेतील अंतिम सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाकडून स्टीव्ह स्मिथने शानदार अर्धशतकी खेळी केली. यासह त्याने असा रेकॉर्ड करून दाखवला आहे, जो गेल्या ९९ वर्षांत कोणालाच करता आला नव्हता. यासह पुढील १०० वर्षात कोणालाही मोडता येणार नाही.**




या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या डावात फलंदाजीसाठी आला. पण ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. या डावातील १०० धावा पूर्ण होण्याआधीच ऑस्ट्रेलियाचे ४ प्रमुख फलंदाज माघारी परतले होते. संघ अडचणीत असताना स्टीव्ह स्मिथ खंबीरपणे उभा राहिला. त्याने या डावात दमदार अर्धशतकी खेळी केली.या डावात फलंदाजी करताना स्मिथने ११२ चेंडूत ६६ धावांची खेळी केली. एका बाजूने विकेट्स जात होते. मात्र स्टीव्ह स्मिथने एक बाजू धरून ठेवली होती. हा सामना लॉर्ड्सच्या मैदानावर सुरू आहे. स्टीव्ह स्मिथ हा लॉर्ड्सच्या मैदानावर खेळताना कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा परदेशी फलंदाज ठरला आहे. त्याने ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज वॉरेन बार्डस्लेचा ९९ वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. गेल्या ९९ वर्षांपासून वॉरेन बार्डस्ले या रेकॉर्डच्या यादीत अव्वल स्थानी होते.वॉरेन बार्डस्ले यांनी १९०९ पासून ते १९२६ दरम्यान ५ लॉर्ड्सच्या मैदानावर खेळताना ५ सामन्यांतील ७ डावात ५७५ धावा केल्या होत्या. यादरम्यान त्यांनी २ शतक आणि २ अर्धशतकं झळकावली होती. आता लॉर्ड्सच्या मैदानावर अर्धशतकी खेळी करताच, स्मिथने ५९१ धावा केल्या आहेत. या मैदानावर खेळताना त्याने २ शतक आणि ३ अर्धशतकं झळकावली आहेत. त्याच्याकडे या मैदानावर फलंदाजी करताना ६०० धावांचा पल्ला गाठण्याची संधी असणार आहे. असा कारनामा करणारा तो पहिलाच परदेशी फलंदाज ठरू शकतो. हा रेकॉर्ड मोडणं खूप कठीण आहे.वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेतील अंतिम सामन्याला सुरुवात झाली आहे. यावेळी दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये अंतिम सामन्याचा थरार रंगणार आहे. या महत्वाच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी हा निर्णय योग्य ठरवत ऑस्ट्रेलियाला एका पाठोपाठ एक मोठे धक्के दिले आहेत. दरम्यान या सामन्यासाठी मैदानात उतरताच स्टीव्ह स्मिथच्या नावावर मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे.स्टीव्ह स्मिथ हा ऑस्ट्रेलियन संघातील सर्वात अनुभवी आणि प्रमुख खेळाडूंपैकी एक आहे. ऑस्ट्रेलियाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेतील अंतिम फेरीत पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. अंतिम सामन्यासाठी मैदानात येताच स्मिथच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे.

### स्मिथचा ऐतिहासिक कारनामा!

. याआधी ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटींगच्या नावे सर्वाधिक वेळेस आयसीसीच्या अंतिम सामन्यात खेळण्याचा रेकॉर्ड होता. त्याने ६ वेळेस आयसीसीच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचं नेतृत्व केलं होतं. आता स्टीव्ह स्मिथ देखील आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील आयसीसीचा सहावा अंतिम सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. यासह त्याने रिकी पाँटींगच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. या यादीत श्रीलंकेचे माजी खेळाडू कुमार संगकारा आणि महेला जयवर्धने यांचा देखील समावेश आहे. या दोघांनी देखील ६-६ वेळेस श्रीलंकेला आयसीसीच्या अंतिम फेरीत पोहोचवण्यात मोलाचं योगदान दिलं आहे.सर्वाधिक वेळेस आयसीसीचा अंतिम सामना खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत विराट कोहली आणि रोहित शर्मा यांचा समावेश आहे. दोघांकडे आयसीसीचे ९ अंतिम सामने खेळण्याचा अनुभव आहे. त्यानंतर रविंद्र जडेजाचा नंबर लागतो. जडेजाकडे आयसीसीचे ८ अंतिम सामने खेळण्याचा अनुभव आहे.

# रोहित वनडे क्रिकेटलाही रामराम करणार?

## रोहितने टी-20 आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारतीय क्रिकेटमध्ये गेल्या काही महिन्यात मोठे बदल झाले आहेत. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेत जेतेपदाला गवसणी घातली. या स्पर्धेनंतर रोहित शर्मा आणि विराट कोहलीने टी-२० क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला. भारतीय टी-२० संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आली आहे.**

तर रोहितने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केल्यानंतर, ही जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे. आता टी-२० आणि कसोटीनंतर रोहितच्या वनडे संघाच्या नेतृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. रोहित शर्मा इथून पुढे कसोटी आणि टी-२० क्रिकेट खेळताना दिसून येणार नाही. मात्र, तो वनडे क्रिकेट खेळताना दिसून येईल. आगामी वनडे वर्ल्डकप २०२७ मध्ये होणार आहे. तोपर्यंत रोहित खेळणार की नाही, यावरही प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे रोहितच्या जागी वनडे संघासाठी नव्या कर्णधाराची घोषणा केली जाऊ शकते असं म्हटलं जात आहे. माध्यमातील वृत्तानुसार, रोहित शर्मानंतर ही जबाबदारी युवा खेळाडूकडे सोपवली जाऊ शकते.




या पदासाठी शुबमन गिलचं नाव चर्चेत आहे. तर सोशल मीडियावर, श्रेयस अय्यरकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्याची मागणी जोर धरू लागली आहे.टी-२० वर्ल्डकपप्रमाणे चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर रोहित शर्मा वनडे क्रिकेटलाही रामराम करेल, असं बीसीसीआयला वाटलं होतं. पण रोहितने तसं केलं नाही. २०२७ वनडे वर्ल्डकपपर्यंत रोहित शर्मा ४० वर्षांचा होईल, त्यामुळे तो वनडे फॉरमॅट खेळणं सुरू ठेवणार का, हा मोठा प्रश्न आहे. आगामी वर्ल्डकप स्पर्धेसाठी अजूनही अडीच वर्षांचा कालावधी शिल्लक आहे. नव्या कर्णधाराला रूजू होण्यासाठी इतका कालावधी पुरेसा आहे.मात्र, रोहित शर्माने चॅम्पियन्स ट्रॉफी झाल्यानंतर वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेणार असल्याच्या चर्चांना पूर्णविराम दिला. त्याने २०२७ चा वनडे वर्ल्डकप खेळण्याची इच्छा व्यक्त केली. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने HT ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, ” आम्हाला असं वाटलं होतं की, चॅम्पियन्स ट्रॉफी झाल्यानंतर रोहित शर्मा निवृत्तीची घोषणा करेल. पण,वनडे क्रिकेटमधील भविष्याबाबत रोहित शर्मा आणि बीसीसीआय यांच्यात कुठलीही चर्चा झालेली नाही.” रोहितच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील फायनलमध्ये न्यूझीलंडला पराभूत करत जेतेपदाचा मान मिळवला होता.

### अय्यरकडे कर्णधारपदाची जबाबदारी

रोहितने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केल्यानंतर, ही जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे. आता टी-२० आणि कसोटीनंतर रोहितच्या वनडे संघाच्या नेतृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.रोहित शर्मा इथून पुढे कसोटी आणि टी-२० क्रिकेट खेळताना दिसून येणार नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। गुरुवार ।
। दि. 12जून 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ज्ञानसाधणेसाठी विश्वासाई नाव ‘प्रियदर्शनी’

## प्रियांदर्शनी इंटरनॅशनल प्री-स्कूल, आळंदी खेड तालुक्यातील एकमेव नोंदणीकृत प्री-स्कूल



। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**खेड तालुक्यातील सुमारे ५० हून अधिक शाळांमध्ये कार्यरत असताना, प्रियदर्शनी इंटरनॅशनल प्री-स्कूल, आळंदी ही एकमेव नोंदणीकृत प्री-स्कूल म्हणून ठळकपणे आपली ओळख निर्माण करत आहे. केवळ मान्यता नव्हे, तर गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधनाधारित अभ्यासक्रम, आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून शालेय शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला जात आहे.**

### गुणवत्तेची खात्री

नोंदणीकृत प्री-स्कूलचा दर्जा नोंदणीसिद्ध दर्जा मिळवणे ही केवळ एक औपचारिकता नसून, हे आमच्या शिक्षणपद्धतीतील शिस्त, गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेत असलेल्या प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. प्रियदर्शनी इंटरनॅशनल प्री-स्कूल हे खेड तालुक्यातील एकमेव अधिकृत प्री-स्कूल असल्याचा अभिमान संस्थेला वाटतो.



### शिक्षणतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नवकल्पनांचे शिक्षण

या शाळेचा अभ्यासक्रम EARLY CHILDHOOD ASSOCIATION (ECA) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आलेला असून, शिक्षण हे अनुभवाधारित, आनंददायी व सर्जनशीलतेला चालना देणारे ठेवले गेले आहे. शाळेचे शिक्षक आणि प्राचार्य डॉ. स्वाती पॉपट यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित ऑनलाइन आणि प्रत्यक्ष कार्यशाळांमध्ये प्रशिक्षण घेतात. त्यामुळे शिक्षकांचे ज्ञान सतत अद्ययावत राहत असून विद्यार्थ्यांना आधुनिक व जागतिक दर्जाचे शिक्षण मिळते.

### बालकेंद्रित आणि अभिनव इन्फ्रास्ट्रक्चर...

प्रियांदर्शनी प्री-स्कूलचे भौतिक रचना पूर्णपणे लहान मुलांच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आली आहे. खुली वर्गरचना जेथे मुलांना मोकळेपणाने शिकता व हालचाल करता येते. विविध प्रकारचे स्पर्शात्मक (टॅक्टाइल) पृष्ठभाग, मुलांसाठी



वैयक्तिक एकांताचे जागा, घुमटाकृती छतातून मिळणारा नैसर्गिक प्रकाश, लक्षवेधक, आनंददायी रंगसंगती, हे सर्व घटक मुलांचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकास अधिक सुस्पष्टपणे घडवतात.

### तंत्रज्ञान आणि पारंपरिक मूल्यांचा समतोल...

प्रियदर्शनी प्री-स्कूलने आधुनिक शिक्षणपद्धतीचा स्वीकार करत AI आधारित तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. मुंबईमधील अनुभवी IB शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना ऑनलाइन वाचन व लेखन कौशल्ये शिकवतात. या हायब्रीड शिक्षण पद्धतीमुळे शिक्षण अधिक प्रभावी, व्यक्तिगत आणि आनंददायी बनते. संज्ञानात्मक आणि मोटर कौशल्यांच्या विकासावर, सेन्सरी समज वाढविण्यावर भर, सर्जनशील अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यावर भर, पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन केले जाते.

### का निवडाल प्रियांदर्शनी इंटरनॅशनल प्री-स्कूल?

1. खेड तालुक्यातील एकमेव नोंदणीकृत प्री-स्कूल
2. EARLY CHILDHOOD ASSOCIATION मान्यताप्राप्त अभ्यासक्रम
3. डॉ. स्वाती पॉपट यांचे मार्गदर्शन
4. बालकेंद्रित, सुरक्षित आणि सर्जनशील परिसर
5. AI आणि आंतरराष्ट्रीय पद्धतीचा समन्वय6. प्रत्येक मुलासाठी प्रेमळ, सुरक्षित आणि आनंदी शिक्षणाचा अनुभव.

# ‘केआयटी’च्या प्राध्यापिका डॉ. दिपाली जाधव यांना पीएच.डी. जाहीर

## मेंदूच्या ट्युमरबाबत शोध निबंध : अचूक निदानासाठी होणार उपयुक्त

।पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कोल्हापूर येथील केआयटी (K.I.T.) महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स अँण्ड इंजिनिअरिंग विभागातील प्राध्यापिका डॉ. दिपाली किशोर जाधव यांना डी. वाय. पाटील कृषी व तंत्रज्ञान विद्यापीठाची पीएच. डी. जाहीर झाली आहे.**



डॉ. जाधव यांनी “DETECTION OF BRAIN TUMOR AND CLASSIFICATION USING STACK ENTROPY BASED CNN AND PREDICTING RECURRENCE USING SCORE BASED SVM” या विषयावर सखोल संशोधन केले असून, मशीन लर्निंग या आधुनिक आणि महत्त्वपूर्ण क्षेत्रात त्यांनी आपले पीएच.डी. संशोधन पूर्ण केले आहे.

या अभ्यासामुळे वैद्यकीय क्षेत्रात मेंदूच्या ट्युमरचे अचूक निदान आणि पुनरावृत्तीची शक्यता ओळखण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग होऊ शकतो. या संशोधनप्रकल्पासाठी डॉ. संग्राम पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. प्रथापण, डीन डॉ. मुरली भूपती, आणि रजिस्ट्रार डॉ. जे. ए. खोत यांचे देखील त्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. डॉ. जाधव यांच्या यशामध्ये केआयटी संस्थेचे विश्वस्त साजिद हुदली, सचिन मेनन, दीपक चौगुले, तसेच संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांचे विशेष सहकार्य आणि प्रोत्साहन लाभले. डॉ. दिपाली जाधव यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील संशोधन व अध्यापन क्षेत्रातील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

> “पीएच.डी. हा केवळ एक शैक्षणिक पदवीचा टप्पा नाही, तर ही माझ्या कठोर परिश्रमांची, मार्गदर्शकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या पाठबळाची पावती आहे. ‘मशीन लर्निंग’सारख्या गतिमान क्षेत्रात संशोधन करताना सतत नवीन शिकायला मिळाले. मी विशेषतः माझे मार्गदर्शक आणि संस्थेचे विश्वस्त यांची मन:पूर्वक आभारी आहे. त्यांच्या पाठिंब्यामुळेच हा शोधनिबंध साकार झाला. ही शैक्षणिक वाटचाल माझ्यासाठी प्रेरणादायी ठरली आहे आणि भविष्यात विद्यार्थ्यांसाठी अधिक समर्पितपणे कार्य करण्याची उर्मी यातून मिळाली आहे.”
>
> **–डॉ. दिपाली जाधव,** प्राध्यापक, केआयटी.




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD
शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा
2025-26
ADMISSIONS
OPEN
प्रज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः
"यत् भावो – तत् भवति"
मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि
नर्सरी शिक्षक प्रशिक्षण
* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..
* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २
प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर,
गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33
संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292